# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 August 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशाला संबोधित करणार
- नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधासाठी दोन हजार ७६६ कोटी रुपयांच्या कामांना सरकारची मंजूरी
- मराठवाडा आणि विदर्भातल्या सर्व १९ जिल्ह्यात दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा मंत्रिमंडळाचा निर्णय
- देशासह राज्यात हर घर तिरंगा अभियानाला उत्साहात सुरुवात

आणि

- राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे पुरस्कार जाहीर तर, साहित्यिक बाबा भांड आणि ईश्वरलाल परमार राज्य गुजराती साहित्य अकादमीच्या कवी नर्मद पुरस्काराचे मानकरी

****

देशाचा ७८ वा स्वातंत्र्यदिन उद्या साजरा होत आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासियांना संबोधित करणार आहेत. सायंकाळी सात वाजता राष्ट्रपतींचं हे भाषण आकाशवाणीवरून प्रसारित होईल. यामुळे आकाशवाणी मुंबई केंद्रावरून दररोज सायंकाळी सात वाजता प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र आज सायंकाळी सहा वाजून ४५ मिनिटांनी प्रसारित केलं जाणार आहे. राष्ट्रपतींच्या भाषणाचा प्रादेशिक भाषांमधला अनुवाद रात्री साडे नऊ वाजता प्रसारित केला जाणार आहे.

****

नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधासाठी दोन हजार ७६६ कोटी रुपयांच्या सुमारे दोन हजार कामांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजुरी दिली आहे. काल झालेल्या राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत ही मंजुरी देतानाच, या कामात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. यावेळी आपत्ती विषयक विविध आराखड्यांना देखीलमंजुरी देण्यात आली.

****

पशुपालन आणि दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातल्या सर्व १९ जिल्ह्यात दुग्ध विकास प्रकल्पाचा दुसरा टप्पा राबवण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. या प्रकल्पासाठी १४९ कोटी २६ लाख रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे.

यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील करणं, शासकीय तसंच खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापकांना ठोक मानधन देणं, मराठवाड्यातल्या खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करणं, तसंच नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्याचा निर्णयही काल मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सहा हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या काँक्रीटीकरणासाठी ३६ हजार ९६४ कोटी खर्चास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार आहेत, यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला बळ, महिला सक्षमीकरणाला चालना मिळणार असल्याचं, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. काल जळगाव इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात ते बोलत होते. लाडकी बहीण योजनेबरोबर राज्यातल्या विकास कामांना खीळ न बसू देता ते अविरतपणे चालू ठेवण्यात येतील, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

स्वातंत्र्यदिनानिमित्त हर घर तिरंगा अभियानाला कालपासून प्रारंभ झाला.

मुंबई महानगरपालिकेत प्रभाग स्तरावर ‘तिरंगा यात्रा’ काढण्यात आली. महानगरपालिका मुख्यालय ते गेट वे ऑफ इंडियापर्यंत निघालेल्या तिरंगा यात्रेत, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर सहभागी झाले होते. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनीही ठिकठिकाणच्या तिरंगा

यात्रांमध्ये सहभाग नोंदवला. नागपूर इथं काल घेतलेल्या तिरंगा मॅरेथॉनमध्ये नागरीक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

****

छत्रपती संभाजीनगर इथंही काल महानगरपालिकेच्या वतीनं तिरंगा यात्रा कढण्यात आली. शहरातल्या क्रांती चौक ते संत एकनाथ रंगमंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या तिरंगा यात्रेमध्ये विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. सैनिकी गणवेश परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी सगळ्याचं लक्ष वेधून घेतलं. वेरूळ इथं काल शालेय विद्यार्थ्यांनी शंभर फूट लांबीच्या तिरंग्यासह प्रभातफेरी काढली.

****

हर घर तिरंगा अभियानांतर्गत काल लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयावर ध्वज फडकावून या उपक्रमाला सुरुवात झाली. जिल्ह्यातल्या शासकीय, निमशासकीय कार्यालयांवर काल तिरंगा ध्वज फडकवण्यात आला.

हिंगोली इथं नगर परिषदेचे मुख्यधिकारी अरविंद मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत 'तिरंगा यात्रा' काढण्यात आली. विविध कार्यालयातले अधिकारी कर्मचारी या रॅलीत सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना तिरंगा ध्वजाचं वितरणही करण्यात आलं.

मराठवाडा विभागातल्या हर घर तिरंगा मोहिमेविषयीची माहिती श्रोत्यांना आज सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी आकाशवाणीवरच्या प्रासंगिक या कार्यक्रमात ऐकता येईल.

****

देशाच्या स्वातंत्र्य दिनी नवी दिल्ली इथं मुख्य सोहळ्यात सहभागी होण्यासाठी जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यातल्या ढासला ग्रामपंचायतीचे सरपंच राम पाटील आणि त्यांच्या पत्नी वर्षाराणी पाटील यांना, तसंच परतूर तालुक्यातले रमेश भापकर आणि त्यांच्या पत्नी पूजा भापकर या दाम्पत्यांना निमंत्रण मिळालं आहे. राम पाटील यांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या...

> ***मला जवळपास १४ वर्ष याठिकाणी होत आहेत, मी तिथं जास्तीत जास्त शासनाच्या योजना असतील, वैयक्तिक लाभाच्या योजना असतील, सार्वजनिक लाभाच्या योजना असतील, प्रत्येक योजनेचा***

***लाभ दिला. किंवा प्रत्येक लाभ घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे माझ्या कामाची दखल घेत माझी याठिकाणी निवड करण्यात आली.***

****

निवासी डॉक्टरांची संघटना – एफ ओ आर डी ए नं पुकारलेलं देशव्यापी आंदोलन काल मागे घेतलं. कोलकाता इथं एका निवासी महिला डॉक्टरवर अत्याचार आणि हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ काल देशभरात ठिकठिकाणी हे आंदोलन करण्यात आलं. संघटनेच्या प्रतिनिधींनी काल नवी दिल्लीत केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्याशी चर्चा केल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आलं.

मुंबईतल्या विविध रुग्णालयांमधल्या निवासी डॉक्टरांनी काल आंदोलन केलं. छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय – घाटीमधल्या निवासी डॉक्टरांनी मेणबत्ती मोर्चा काढून निषेध नोंदवला.

****

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या या वर्षीच्या विविध पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, तर आरती अंकलीकर–टिकेकर यांना भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. यासह विविध सहा जीवनगौरव पुरस्कार तसंच १२ गटांत सांस्कृतिक पुरस्कार काल जाहीर करण्यात आले.

राज्य गुजराती साहित्य अकादमीचा कवी नर्मद पुरस्कार यंदा ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड आणि ईश्वरलाल परमार यांना जाहीर झाला आहे. येत्या २४ ऑगस्ट रोजी सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

****

बीड जिल्ह्यात २०२३–२४ च्या खरीप आणि रब्बी हंगामातल्या उर्वरित २२ कोटी तीन लाख रुपयांचं वितरण विमा कंपनीने कोणतंही कारण न देता ३१ ऑगस्टच्या आत पूर्ण करावे, असे निर्देश कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत. यासंदर्भातल्या बैठकीत ते काल बोलत होते. या वर्षासाठी एकूण ४०० कोटी २४ लाख रुपये पीकविमा आतापर्यंत मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी ३७८ कोटी २१ लाख रुपयांचं वितरण संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात करण्यात आलं आहे.

****

नांदेडचे खासदार वसंतराव चव्हाण यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना काल संध्याकाळी हवाई रुग्णवाहिकेतून हैदराबाद इथं हलवण्यात आलं. त्यांच्यावर तातडीनं उपचार सुरू करण्यात आल्यानं सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं त्याच्या कुटुंबियांनी सांगितलं. काल त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. तसंच त्यांचा रक्तदाबही कमी झाला होता, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

परभणी शहरापासून जवळच असलेल्या सुकापुर वाडी गावाला रस्ता नसल्यानं इथल्या नागरिकांनी काल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर यांच्या दालनात विद्यार्थ्यांसह शाळा भरवली. मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत इथून हलणार नसल्याचा पवित्रा या सर्वांनी घेतल्यानं, काही काळ गोंधळ निर्माण झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं ५० लाख ८२ हजार रुपये किमतीचा गुटख्यासह एकूण ७० लाख ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल काल जप्त केला. बीडहून निघालेला हा ट्रक जालना-अंबड मार्गावरील लालवाडी शिवारातून जालन्याकडे येत असताना पोलिसांनी ही कारवाई करत, ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

****

विविध आपत्ती संदर्भात जनजागृती करण्यासाठी काल लातूर इथं मिनी मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, गृहरक्षक दल, अग्निशमन दल तसेच जिल्हा शोध आणि बचाव पथकातल्या सदस्यांनी सहभाग घेतला होता.

****

माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा १२ वा स्मृतीदिन आज पाळण्यात येत आहे. यानिमित्तानं विविध वैद्यकीय संघटना आणि विलासराव देशमुख फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे.

****